# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय:- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील डाईंग,सायजिंग व औद्योगिक आस्थापना अनाधिकृतपणे व अनाधिकाराने पाईप लाईन व्दारे बोअरवेल, विहीर नाले अन्य स्त्रोतातून विनापरवाना पाणी वापर असुन त्याबाबत धोरणात्मक निर्णयाच्या प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणेबाबत.**

भिवंडी मनपा कार्यक्षेत्रात विविध प्रकारच्या ८४ सायजिंग व ५३ डाईंग असुन (सद्या ४४ कार्यरत आहेत) असे एकुण १३७ औद्योगिक आस्थापना आहेत. या सर्व औद्योगिक आस्थापनाकरीता पाण्याची आवश्यकता असते, सदरचे सायजिंग,डाईंगधारक बोअरवेल,विहीर व इतर अन्य स्त्रोतातून विनापरवानगी नाले,गटार,रस्ता ईत्यादी मधुन पी.व्ही.सी. पाईप लाईन टाकुन पाणी घेत असल्याने आढळुन आले आहे. ब-याच प्रमाणात मोठे बंदिस्त नाले,ओपन नाले,गटारामधुन अनाधिकृत पाण्याच्या लाईन घेतल्यामुळे पावसाळयात मोठया प्रमाणात सदर नाले-गटाराची सफाई न करता आल्यामुळे त्या ठिकाणी पावसाचे पाणी साठत आहे. त्यामुळे सदर परिसरातील नागरीकांच्या तक्रारी येत आहेत. सदर बाबत मनपाकडुन वारंवार पाईप कट करुन संबंधीत डाईंग सायजिंगच्या मालकावर,मॅनेजर यांच्यावर विविध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल केलेले आहेत. सदर कारवाईबाबत डाईंग मालक नेहमी आम्हास पाईप लाईन टाकणेची परवानगी मागत असतात. परंतु आपणाकडे सदरबाबत अद्यापपर्यंत कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला नाही.

महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात महसुलामध्ये मोठया प्रमाणात तुट असुन सद्यस्थितीत भिवंडी महापालिकेस स्टेम कंपनी व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन पुरविण्यात आलेल्या पाणी पुरवठयाचे देयकाचे प्रती वर्षी रु. ५५ ते ६० कोटी अदा करावे लागत आहे.

तसेच पाणी पुरवठा विभागातील विविध प्रकारच्या निगा व दुरुस्ती कामी मनुष्यबळ पुरविणे कामी रु. ६ ते ६.५ कोटी अदा करावे लागत आहे. सद्यस्थितीत मनपा पाणी पुरवठा विभागाच्या मनुष्य आस्थापना खाली सुमारे रु. ७० कोटी इतमा खर्च होत आहे. सदर तुट भरून काढणेकामी मनपाचे प्रशासनाने प्रत्येक घराकरीता नळ कनेक्शन असो व नसो अशा घरगुती मालमत्ताधारकांना सरसकट पाणीपट्टी लावण्यात आली आहे. त्याबाबत शासन निर्णय निर्गमित झाला होता. आर्थीक वर्ष २०२४-२५ करीता पाणीपटटीची चालु मागणी रु.३१,७४,१५,६२६/- मागणी असुन वसुली रु.२०,३५,१४,६७२/- असुन वसुलीचे प्रमाण रु.१०.५ कोटीचे कमी असुन त्यामध्ये देखील इतकी २६ टक्के तुट आहे. प्रत्येकक्षात होणारा खर्च व पाणीपटटी बिलाची मागणी त्यामध्ये सुमारे ४२ टक्के इतकी तफावत होत आहे.

सद्यस्थितीत सदर तफावतीमुळे शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या १५ वित्त आयोगाच्या अनुदाना संदर्भातील वित्त आयोगाच्या नियमावलीनुसार समतोल राखणे अनिवार्य आहे. तसे न झाल्यास १५ वित्त आयोगाचा निधी पुरेशा प्रमाणात प्राप्त होणार नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थीक स्थितीवर मोठया प्रमाणत परिणाम होणार आहे. भिवंडी मनपाच्या प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील डाईंग व सायजिंगमध्ये जाणारे पाण्याची पाईप लाईनचे सर्वेक्षण केले असता सदर सर्वेक्षणामध्ये एकुण ४४ डाईंगमध्ये अनाधिकृत रित्या पाईप लाईन टाकुन डाईंगमध्ये व्यापारासाठी होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

या सर्व बाबींचा विचार करता महानगरपालिकेचे महसुली उत्पन्न वाढविणेकामी शहरातील वस्त्रउद्योग आस्थापनाकडुन ते वापरत असलेल्या भुजल,विहीर,नाले गटार,बोअरवेल,खाजगी व इतर कोणत्याही स्त्रोतातुन वापरत असलेल्या पाण्यावर कर वसुली करणे तसेच पाणी वाहुन नेण्याकरीता अस्तीत्वात असलेल्या सर्व प्रकारच्या पाईप लाईन (जी.आय., पी.व्ही.सी.) करीता दंड,खोदाई शुल्क,पाणी वाहन शुल्क अनामत रक्कम व मनपाच्या रस्त्याचे जागे भाडे इत्यादी बाबींवर कर वसुली करणे आवश्यक आहे. सदर कर वसुली केल्यास मनपाच्या आर्थिक उत्पन्नात, महसुल मध्ये वाढ होणार आहे व होणारी तुट कामी प्रमाणात भरुन निघणार आहे.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९६ (१),(२),(३),(४) अन्वये पिण्याच्या पाण्याचे सार्वजनिक झरे इत्यादी महानगरपालिकेत आयुक्ताच्या नियंत्रणाखाली असतील अशी तरतुद नमुद आहे.**

त्या अनुषंगाने मनपा कार्यक्षेत्रातील औद्योगिक मालमत्तांची पाणी पुरवठा विभागामार्फत स्थळ पहाणी करुन डाईंग, सायजिंग व औद्योगिक इत्यादी आस्थापनाद्वारे अनाधिकृतपणे पाईप लाईनद्वारे बोअरवेल, विहीर नाले अन्य स्त्रोतातून विनापरवाना पाणी वापर करीत असलेबाबत पंचनामा करुन कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभागाकडून, मा. अतिरीक्त आयुक्त यांचेमार्फत वापरकरीत असलेल्या स्त्रोताचे मोजमाप करुन सदर धारकांकडून त्याकरीता वस्त्रउद्योग आस्थापनाकडून वापरत असलेल्या पाण्याच्या परीमाणानुसार दर आकारणी निश्चीत करुन खालील प्रमाणे शुल्क प्रस्तावीत करण्याचे नियोजन आहे.

**प्रस्तावीत रस्ता खोदाई व इतर शुल्क**

| अ.क्र. | रस्ताचे प्रकार | निर्धारीत शुल्क | शेरा |
|---|---|---|---|
| १ | डांबरी रस्ता | रनिंग मीटर | रु.३३६/- |
| २ | सी सी रस्ता | रनिंग मीटर | रु.३८७/- |
| ३ | पेव्हर ब्लॉक | रनिंग मीटर | रु. २९३/- |
| ४ | खडी रस्ता | रनिंग मीटर | रु. ८३/- |
| ५ | माती रस्ता | रनिंग मीटर | रु. ३३/- |
| ६ | वहन खर्च भुभाडे प्रती महिना<br>१" ते २.५", ३" ते ४" व्यासाची<br>कोणत्यही प्रकारची पाईप लाईन | १" प्रति मीटर/प्रति महिना<br>२" ते २.५"प्रति मीटर./प्रति महिना<br>३" प्रति मीटर/प्रति महिना<br>४" प्रति मीटर/प्रति महिना | रु.५/-<br>रु.१०/-<br>रु.१५/-<br>रु.१५/- |
| ७ | भुजलनाले,गटार,विहीर,बोअरेवल इत्यादी<br>मधुन पाण्याचा वापर प्रती पाईप<br>लाईन,प्रति महिना | १" प्रति पाईप लाईन/प्रति महिना<br>२" ते २.५"प्रति पाईप लाईन/<br>प्रति महिना<br>३" प्रति पाईप लाईन /प्रति महिना<br>४" प्रति पाईप लाईन /प्रति महिना | रु.२५,०००/-<br>रु.४०,०००/-<br>रु.५०,०००/-<br>रु.५०,०००/- |
| ८ | अनामत रक्कम १ लाख | प्रति डाईंग | रु.१ लक्ष. |

**<u>औद्योगिक आस्थापनाकडून पाणी वापराबाबत कर आकारणी करणेची कार्यवाही</u>**

१.भिवंडी शहरातील विविध औद्योगिक आस्थापना जसे की डाईंग, सायजिंग, पावरलुम कारखाने, मनी कारखाने इत्यादी औद्योगिक मालमत्तांना भेट देऊन सदर आस्थापनांस आवश्यक असणारे पाणी, पाण्याचे स्त्रोत, पाण्याकरीता अंथरण्यात आलेली पाईप लाईन, बोअरवेल, पाण्याचे डबके, शासकीय मनपा मालकीच्या सर्व प्रकारचे गटारे,नाले,तलाव यातून झिरपणारे पाणी, संचय करुन साठवण केलेले ठिकाणे इत्यादी सर्व बाबींची तपासणी करुन व पाईप लाईनची तपासणी करणे, पाईप लाईन मोजमाप करणे, पाण्याची स्त्रोताची संख्या मोजणे इत्यादी पहाणी करुन सदर आस्थापनेस कर आकारणीबाबत नोटीस देण्याची कार्यवाही करणे.

२. पाणी पुरवठा विभागाकडुन कर आकारणी करणेकामी केलेल्या पंचनात्याचे अवलोकन करुन स्त्रोताची संख्या, रस्ता खोदाई, भुभाडे, अनामत रक्कम इत्यादी सर्व शुल्कासह प्रत्येक ३ महिन्यांकरीता कर आकरणी करुन दर निश्चित करणे.

३. सदर आस्थापनेकरीता पाणी वापराबाबत शुल्क आकारणी बाबत परीपुर्ण प्रस्ताव कनिष्ठ अभियंता, उप अभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांचे मान्यतेनंतर मा. अतिरिक्त आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी, पाणी पुरवठा विभाग यांचेकडे मंजूरीकरीता सादर करणे.

अशा प्रकारच्या दरानुसार करआकारणी करणे आवश्यक आहे. सदर दर आकारणी कामी करमुल्यांकन विभाग व पाणी पुरवठा विभागाकडुन संयुक्तीक पाहणी करुन सदर कर आकारणी करणे आवश्यक आहे. जेणेकरुन वार्षिक मालमत्ता कराबरोबर सदर उद्योग आस्थापनेचे मालमत्ता देयक आकारणे संयुक्तीक होईल.

**शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) नवि-१४ दिनांक ०६ जून २०२२ रोजी नूसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी नि.श.महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक**

**पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील डाईंग, सायजिंग व औद्योगिक आस्थापना अनाधिकृतपणे व अनाधिकाराने पाईप लाईनव्दारे बोअरवेल, विहीर नाले अन्य स्त्रोतातून विनापरवाना पाणी वापर असुन त्याबाबत धोरणात्मक निर्णयाच्या प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबत प्रस्ताव तयार केला असून मंजूरीस्तव सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमाक:** 1002 **दिनांक** १९/१२/ **२०२४**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील डाईंग, सायजिंग व औद्योगिक आस्थापना अनाधिकृतपणे व अनाधिकाराने पाईप लाईनव्दारे बोअरवेल, विहीर नाले अन्य स्त्रोतातून विनापरवाना पाणी वापर असुन त्याबाबत धोरणात्मक निर्णयाच्या प्रशासकीय ठरावास मान्यता मिळणे बाबत प्रस्तावास कार्यकारी अभियंता व अति.आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम सी ओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि. ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील डाईंग, सायजिंग व औद्योगिक आस्थापना अनाधिकृतपणे व अनाधिकाराने पाईप लाईनव्दारे बोअरवेल, विहीर नाले अन्य स्त्रोतातून विनापरवाना पाणी वापर करत असल्याने त्यांना खालील प्रमाणे शुल्क प्रस्तावीत आहे.

**प्रस्तावीत रस्ता खोदाई व इतर शुल्क**

| अ.क्र. | रस्ताचे प्रकार | निर्धारीत शुल्क | शेरा |
|---|---|---|---|
| १ | **डांबरी रस्ता** | **रनिंग मीटर** | **रु.३३६/-** |
| २ | **सी सी रस्ता** | **रनिंग मीटर** | **रु.३८७/-** |
| ३ | **पेव्हर ब्लॉक** | **रनिंग मीटर** | **रु. २९३/-** |
| ४ | **खडी रस्ता** | **रनिंग मीटर** | **रु. ८३/-** |
| ५ | **माती रस्ता** | **रनिंग मीटर** | **रु. ३३/-** |
| ६ | **वहन खर्च भुभाडे प्रती महिना १" ते २.५", ३" ते ४" व्यासाची कोणत्यही प्रकारची पाईप लाईन** | **१" प्रति मीटर/प्रति महिना<br>२" ते २.५"प्रति मीटर./प्रति महिना<br>३" प्रति मीटर/प्रति महिना<br>४" प्रति मीटर/प्रति महिना** | **रु.५/-<br>रु.१०/-<br>रु.१५/-<br>रु.१५/-** |
| ७ | **भुजलनाले,गटार,विहीर,बोअरेवल इत्यादी मधुन पाण्याचा वापर प्रती पाईप लाईन,प्रति महिना** | **१" प्रति पाईप लाईन/प्रति महिना<br>२" ते २.५"प्रति पाईप लाईन/ प्रति महिना<br>३" प्रति पाईप लाईन /प्रति महिना<br>४" प्रति पाईप लाईन /प्रति महिना** | **रु.२५,०००/-<br>रु.४०,०००/-<br>रु.५०,०००/-<br>रु.५०,०००/-** |
| ८ | **अनामत रक्कम १ लाख** | **प्रति डाईंग** | **रु.१ लक्ष.** |

तरी वरील नमुद दरानुसार शहरातील सर्व प्रकारच्या औद्योगिक व व्यापारी अस्थापनाकडून करआकारणी करणेच्या धोरणात्मक निर्णयाच्या प्रशासकीय ठरावास मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**